MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

# Model Answer
## Set- I
## Std. – 10th MM/Semi
## Subject – Marathi H.L.

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

Time: 3 hrs | Marks: 80

### विभाग – १ गद्य

**प्र. १ अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) **कोष्टक पूर्ण करा.**

मराठीने या भाषांमधील शब्द आपले मानले

| संस्कृत | फारसी | अरबी | कन्नड | इंग्रजी |
|---|---|---|---|---|

२) **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) शब्दांची व्युत्पती शोधणे हा भाषेतील गंमत जाणून घेण्याचा मार्ग आहे.

ब) भाषेमध्ये अनेक शब्द येतात म्हणून ती नदीसारखी प्रवाही असते.

३) परभाषेतून आपल्या भाषेत अनेक नवीन शब्द आले आहेत, ते केव्हाच मराठी झाले आहेत. ते मराठी शब्द नाहीत, अशी कोणाला शंकाही येणार नाही. आता 'केक' या शब्दाचेच पाहा ना. मराठीत या वस्तूसाठी शब्दच नव्हता. अजूनही नाही. कारण ही वस्तू, ही संकल्पना मराठी समाजालाच नवीन होती. त्या नवीन वस्तूसाठी 'केक' हा इंग्रजी शब्द जसाच्या तसा स्वीकारणे योग्यच होते. मात्र काही वेळा परभाषेतील शब्द अकारण वापरले जातात. आणि तेसुद्धा आपल्या भाषेत त्यासाठी अत्यंत सार्थ, समर्पक शब्द असताना! अलीकडे "ती पिवळीवाली बॅग द्या," "तो पांढरावाला पट्टा दाखवा" अशी वाक्ये सर्रास ऐकू येतात. वास्तविक पाहता 'पिवळी बॅग' आणि पिवळीवाली बॅग' यांत कोणता फरक आहे? 'पिवळी बॅग' या शब्दप्रयोगातून आधीपासूनच योग्य अर्थ व्यक्त होत असताना 'पिवळीवाली' हा नवीन शब्दप्रयोग का करावा? मराठीत आपण असे बोलतच नाही. मराठीत 'वाला' हा प्रत्यय फक्त नामाला जोडला जातो. 'पिवळी' हे विशेषण आहे. मराठीत विशेषणाला किंवा सर्वनामाला 'वाला' हा प्रत्यय जोडण्याची प्रथाच नाही. शिवाय त्या नवीन शब्दप्रयोगाने अर्थामध्ये कोणतीही भर पडत नाही. म्हणून गरज नसताना परभाषेतील शब्द वापरुन बोलू नये, हे लेखिकेचे मत योग्यच आहे.

**ब) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१) **पूर्ण करा.**

दरोडेखोरांनी अरुणिमाला चालत्या गाडीतून बाहेर फेकल्याचे परिणाम –

i) अरुणिमा शेजारून जाणा-या भरधाव रेल्वेवर आदळली.

ii) भरधाव रेल्वेच्या वेगामुळे जोरात दोन धावपट्ट्यांच्या मध्ये पडली.

iii) धावपट्टीवरुन, (ट्रॅकवरुन) पाय बाजूला घेण्याआधीच रेल्वे पायावरून गेली.

iv) अरुणिमाच्या पायावरून त्या रात्री ४९ गाड्या गेल्या.

v) एका पायाच्या गुडघ्यापासून खालच्या हाडांचा चक्काचूर झाला.

२) **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) सोन्याची साखळी हिसकावून घेणा-या चोरांना प्रतिकार केल्यामुळे चोरांनी अरुणिमाला रेल्वेतून बाहेर फेकून दिले.

ब) 'कागदपत्रांचे काम झाले की आपले काम पक्के' हे विचारचक्र अरुणिमाच्या डोक्यात सुरू झाले.

३) 'अन्यायाविरुद्ध लढणे हे जणू पाप आहे' हे विधान मला तरी चुकीचे वाटते. कारण जेथे जेथे अन्याय होताना दिसेल तेथे तेथे माणसाने अन्यायाचा प्रतिकार करुन त्याला समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न केला पहिजे. निमूटपणे, गुपचूप अन्याय सहन करणे किंवा एखाद्यावर अन्याय होताना पाहणे हे पाप आहे. माणुसकीला कलंक, काळिमा लावण्यासारखे आहे. अन्यायाविरुद्ध लढून एखाद्याला न्याय मिळवून देणे याच्यासारखे पवित्र, पुण्यकारक काम कोणतेही नाही.

**क) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) आकृती पूर्ण करा.**

अ)

| निसर्गावर प्रेम करणारा माणूस असा असतो | |
|---|---|
| सुजाण | सुविचारी |

ब)

| जीवनात यापासून सुखसोयी मिळतात | | |
|---|---|---|
| वीज | पाणी | झाडं |

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) स्वतःच्या सुखासाठी माणूस निसर्गाची हानी करतो.

ब) नैसर्गिक संपत्तीची नासाडी होऊ नये आणि निसर्गाचा समतोल राखला जावा यासाठी माणसाने प्रयत्न केला पाहिजे.

## विभाग – २ पद्य

**प्र. २ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) कोष्टक पूर्ण करा.

मन वाईट गोष्टींकडे वळू नये म्हणून या गोष्टी कराव्यात

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मन भावचरित्रावर (परमार्थावर) जडवावे. | मनातील निश्चय ढळू देऊ नये. | भजन करताना मन विचलित होऊ देऊ नये. | मन मलीन होऊ देऊ नये. | संतांनी दाखविलेल्या मार्गावर चालावे. |

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) आत्मबोधाने मनात येणा-या वाईट विचारांचा नाश व्हावा.

ब) मनातील इच्छा नामस्मरणाने पूर्ण होतील.

३) 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' या उक्तीप्रमाणे आपले जीवन घडवणे किंवा बिघडवणे हे आपल्याच हातात असते. आपल्याला जीवनात प्रगती करायची आहे. जीवन सार्थकी लावायचे आहे? की अधोगतीकडे जायचे आहे, हे प्रत्येकाने स्वतःहून ठरवायचे असते. त्यासाठी आपण कोणाची संगत करतो, कोणाच्या सहवासात राहतो याला फार महत्त्व आहे आणि म्हणूनच पंडीत कवी वरील पंक्तीतून परमेश्वराकडे मागणी मागताना, त्याची प्रार्थना करताना म्हणतात, हे भगवंता, मला नेहमी सज्जनांची संगती घडू दे. त्यांच्या सहवासात राहिलो तर माझ्यात त्यांच्यातील सद्गुण येतील. माझ्यातील दुर्गुण हळूहळू नष्ट होतील. माझे मन आणि जीवन सन्मार्गाला लागेल. साधूंच्या सहवासात माझे मन राहू दे. कारण तेथे चांगले विचार (सुविचार), सद्विचार माझ्या कानांवर पडतील आणि माझे जीवन सद्विचारांनी पुष्ट होईल. माझ्या आयुष्याचे सार्थक होईल.

४) मनुष्य आपल्या जीवनात अनेकवेळा अनेक प्रकारचे निश्चय करतो पण त्याने केलेला एखादाच निश्चय पूर्णत्वास जातो, तडीस जातो. कारण तिथपर्यंत जाताना मार्गात बाधा आल्यास तो निश्चयापासून पराङ्मुख

होतो, ढळतो एवढेच नाही तर केलेला निश्चयाही विसरतो. म्हणून कविवर्य मोरोपंत देवाकडे प्रार्थना करताना म्हणतात की हे देवा! माझा नेहमी निश्चय दृढ असू दे. तो कधीही ढळू देऊ नकोस. दुष्ट लोकांनी मार्गात बाधा आणल्यास त्यातून पुढे जाण्याची शक्ती तू मला दे.

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.**

**आश्वासक चित्र**

१) कवितेची कवयित्री – नीरजा

२) कवितेचा रचनाप्रकार – मुक्तछंद

३) कवितेतून मिळणारा संदेश –घर सांभाळणे ही केवळ स्त्रियांची जबाबदारी असून तिने नोकरीबरोबर घर सांभाळण्याची तारेवरची कसरत करावी हा विचार चुकीचा असून पुरुषाने नोकरी-धंदा करतानाच आपल्या पत्नीला घर कामात बरोबरीने सहकार्य करावे हा स्त्री-पुरूष समानतेचा संदेश या कवितेतून मिळतो.

**खोद आणखी थोडेसे**

१) कवितेची कवयित्री – आसावरी काकडे

२) कवितेचा रचनाप्रकार – यमक साधणारी गेय कविता

३) कवितेतून मिळणारा संदेश – आपल्या अडचणींने भरलेल्या आयुष्यात 'आशावाद' फार महत्त्वाचा आहे. आजूबाजूला नकारात्मक गोष्टी होत असताना प्रयत्न केले तर यश मिळणारच असा सकारात्मक संदेश या कवितेद्वारे दिला गेला आहे. 'थांबला तो संपला' हे लक्षात ठेवूनेच पुढे जायचे आहे असा संदेश देण्याचा प्रयत्न कवयित्रीने केला आहे.

**क) रसग्रहण** –

सामाजिक परंपरा नाकारून नव्या समाजाची जडणघडण करताना वाटेत आलेल्या खाचखळग्यांची जराही तमा न बाळगता, बाबासाहेबांनी 'न भूतो न भविष्यति' असे जे अभूतपूर्व कार्य केले त्याचा समाजावर झालेला परिणाम कवी ज. वि. पवार 'तू झालास मूक समाजाचा नायक' या काव्यातील वरील पंक्तीतून सुचित करीत आहेत. सर्वसामान्यांसाठी असलेल्या पाणवठ्यावर जेव्हा दलित समाजातील लोकांना पाण्यासाठी मज्जाव केला गेला, तेव्हा त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह केला आणि त्यांना त्यांचा अधिकार मिळवून दिला. बाबासाहेबांच्या या कार्यात वाघाची डरकाळी होती. ती इतकी धारदार होती. तेजस्वी होती की, त्यामुळे आकाशाला हादरा बसला. पृथ्वी हेलकावे खाऊ लागली म्हणजे प्रत्येक दलित स्वहक्काबाबत खडबडून जागा झाला. तत्कालीन समाजाला दिलेला हा धक्काच होता.

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र. ३ कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) व्युत्पत्ती कोशाचे कार्य – व्युत्पती म्हणजे एखाद्या शब्दाच्या किंवा अर्थाच्या मुळाचे ज्ञान होय. व्युत्पत्ती सांगणे म्हणजे एखाद्या शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे होय. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश! व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते. १) मराठी भाषेतील - प्रमाण व बोली - शब्दांचे मूळ रूप दाखवणे. २) विशिष्ट प्रदेशात व भौगोलिक परिसरात एकाच शब्दातील उच्चारात बदल होत असतो. हा शब्दाच्या उच्चारातील बदल व फरक दाखवणे. ३) भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने फरक होत असतात. भिन्न भिन्न काळात जे शब्दांत बदल होतात, त्या बदलांचे कारण स्पष्ट करणे. ४) भिन्न भिन्न समाजांत वेगवेगळ्या कारणांनी शब्दांच्या अर्थाच्या अंगानेही बदल संभवतात. हे अर्थातील बदल स्पष्ट करणे.

२) बालसाहित्यिका गिरिजा कीर यांनी लिहिलेल्या 'गोष्ट एका माणसाची' या नितांत सुंदर कथेतील मधू या गरीब मुलाची आई आजारी पडते. तिच्या पोटात गाठी झालेल्या असतात आणि केवळ ऑपरेशन केले तरच तिला बरे

वाटेल असे, डॉक्टर मधूला सांगतात. मधूकडे ऑपरेशनसाठी पैसे नसतात म्हणून तो नाइलाजाने एका माणसाचे पाकीट मारतो. त्या पाकिटात दोन हजार रुपये व चिठ्ठी असते. एका मुलाने आपल्या आजारी आईच्या औषधोपचारासाठी ते पैसे पाठवलेले असतात. हे पत्र वाचल्यावर मधूचे डोळे उघडतात. त्याला आपल्या केलेल्या कृत्याचा फार पश्चाताप होते. चिठ्ठीतील पत्ता शोधत मधू त्या माणसाकडे जातो व आपण केलेल्या वाईट कृत्याची कबुली देतो. मधूने केलेले हे कृत्य त्याच्या संवेदनशील मनाचे उत्तम उदाहरण आहे असे मला वाटते कारण त्याला पैशाची नितांत गरज असतानाही ज्याचे ते पैसे होते त्याला ते पैसे परत करायला मधू जातो यावरून तो संवेदनशील आहे हे स्पष्ट होते.

३) मातीत बीज पेरलं की, मातीच्या कष्टमय मायेतून त्याचे झाड होते. माती त्या बीजाला सगळ्या नैसर्गिक आपत्तींपासून वाचवते. दुष्काळाशी लढते. बीजाची मायेने निगराणी करते. या सर्व प्रक्रियेतून बीजाचा वृक्ष होतो. त्याचप्रमाणे आजच्या मूल्यहीन समाजामध्ये चांगल्या संस्कारांच्या मातीत जर माणसांना पेरले, तर त्यातून मानवतेचा निकोप वृक्ष उभा राहील अशी आशादायक भावना या विधानातून व्यक्त झाली आहे. नवविचारांच्या नवसमाजात माणुसकीला बहर येईल व मानवजात सुखी होईल, असा सर्जनशील आशय 'माणूस पेरा! माणुसकी उगवेल!' या विधानातून व्यक्त होतो.

**विभाग ४ – भाषाभ्यास**

**प्र. ४ अ) व्याकरण घटकावर आधारित कृती**

१) **समास** – सामासिक शब्द आणि समास यांच्या जोड्या लावा.

| सामासिक शब्द | | समास |
|---|---|---|
| दररोज | – | अव्ययीभाव समास |
| मागेपुढे | – | इतरेतर द्वंद्व समास |
| नवरात्री | – | द्विगु समास |
| तीनचार | – | वैकल्पिक द्वंद्व समास |

२) **शब्दसिद्धी**.

अ) दोन अनुकरणवाचक शब्द लिहा.

जसे गडगडाट – i) सळसळाट ii) फडफडाट

ब) 'प्र' हा उपसर्ग लावून तयार होणारे दोन शब्द लिहा –

i) प्रगती ii) प्रताप

३) **वाक्प्रचार – पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i) आवर घालणे – लगाम घालणे.

वाक्य – मुलांमधील वाईट गुणांना वेळीच आवर घातला पाहिजे.

ii) ज्ञात असणे – माहीत असणे.

वाक्य – महिमाला प्रथम क्रमांक मिळणार हे शिक्षकांना ज्ञात होते.

iii) कुचेष्टा करणे – टिंगल करणे.

वाक्य – सगळी मुले गरीब राजूची कुचेष्टा करतात.

iv) रुंजी घालणे – अवतीभवती फिरणे.

वाक्य – लहान मुले आपल्या आईभोवती सतत रुंजी घालत असतात.

**आ) भाषासौंदर्य.**

**१) शब्दसंपत्ती.**

i) खालील शब्दाचे दोन अर्थ लिहा.

**अ)** वचक ← वजन → माप   **ब)** खोलपणा ← खोली → घराचा एक भाग

ii) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.

अ) समाजाची सेवा करणारा – समाजसेवक   ब) पाने गळून पडलेला – निष्पर्ण

iii) दिलेल्या शब्दांतील समानार्थी व विरुद्धार्थी शब्दांच्या चार जोड्या तयार करा.

| समानार्थी शब्द | विरुद्धार्थी शब्द |
|---|---|
| सतत = अविरत | कमाल x किमान |
| नयन = चक्षू | डोळस x आंधळा |

iv) दिलेल्या शब्दापासून चार अर्थ पूर्ण शब्द तयार करा.

विमानतळ – विमान  तळ  नळ  माळ  मात

**२) लेखननियमांनुसार लेखन** – अचूक शब्द ओळखा.

i) कर्तृत्व  ii) व्यक्ती  iii) सैरभैर  iv) प्रशिक्षण  v) सराईत  vi) चिन्ह

**३) विरामचिन्हे** – खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे ओळखा व ती दुरुस्त करुन वाक्य पुन्हा लिहा.

'अरुणिमा, रेल्वे येतेय आणि तुझे पाय ट्रॅकवरुन बाजूला घे.'

**४) पारिभाषिक शब्द** – खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.

अ) Unit – घटक   ब) Mobile – भ्रमणध्वनी

## विभाग ५ – उपयोजित लेखन

**प्र.५ अ) पुढील दोनपैकी कोणतीही एक कृती सोडवा.**

**१) खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा.**

दि. २६ जुलै, २०२२

मा. व्यवस्थापक

ग्लोबल सायन्टिफीक सेंटर,

भवानी शंकर रोड, कोल्हापूर ४१२०१२

विषय – आमच्या शाळेतील प्रयोगशाळेत लागणा-या उपकरणांची मागणी करण्याबाबत.

मा. महोदय,

मी विद्यालंकार विद्यालय, कागलचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने हे पत्र मा. मुख्याध्यापकांच्या परवानगिने लिहीत आहे. आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या यावर्षी वाढली असल्यामुळे रसायनशास्त्राच्या प्रयोगास उपयोगी असणा-या अनेक उपकरणांची कमतरता भासत आहे. अनेक विद्यार्थ्यांना एकाच वेळेस प्रयोग करण्याची संधी मिळून, त्यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने त्यांचा वेळ वाचविणे आवश्यक आहे. म्हणून आपण त्वरित उपकरणांची मागणी नोंदवून घ्यावी व लवकरात लवकर उपकरणे पाठविण्याची सोय करावी. सोबत शाळेच्या मुख्याध्यापकांचे परवानगीपत्र जोडलेले आहे.

| वस्तूचे नाव | संख्या |
|---|---|
| टेस्ट ट्यूब | २५ |

| | |
|---|---|
| बिकर | ३० |
| फनेल | ३० |
| पिपेट | २५ |

आपला विश्वासू,

अ. ब. क.

विद्यार्थी प्रतिनिधी,

विद्यालंकार विद्यालय,

कागल, कोल्हापूर.

Mail id – abc@gmauk.com

२) **सारांशलेखन** –

प्रत्येक सुजाण, माणूस निसर्गावर प्रेम करत असला तरी स्वतःच्या सुखासाठी निसर्गाची हानी करतो. निसर्गाचा वापर गरजेपुरताच करावा. नैसर्गिक संपत्तीची नासाडी न होता, निसर्गाचा समतोल राखला जावा हा विचार जगभरात पसरत आहे. कोस्टॅरिका, केनिया आणि काही विकसित देशात निसर्गाशी मैत्री हे तत्त्व वापरले जाते.

**आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) **जाहिरातलेखन** –

आला आला उन्हाळा 'आस्वाद' आहे सेवेला

गारे गार!! स्वादिष्ट!! मलाईदार!!

आपल्या विभागात सुरू झालेले आईस्क्रीम पार्लर

||**आस्वाद आईस्क्रीम पार्लर** ||

आमच्याकडे विविध प्रकाराची व स्वादाची,

आईस्क्रीम मिळतात.

सर्व प्रकारचे फ्रूट ज्यूसेस

वेगवेगळ्या स्वादातील मस्तानी व मिल्कशेक उपलब्ध

**एकदा याल, पुन्हा-पुन्हा याल!**

आस्वाद आईस्क्रीम पार्लर,

सितारा बाजार, दादर (प)

कोहिनूर सिनेमा समोर

|| ग्राहकांचे समाधान व सेवा हेच आमचे ध्येय||

२) **कथालेखन** –

प्रामाणिकपणाचे फळ

एक गरीब रिक्षावाला होता. तो रिक्षा चालवून आपले कुटुंबाचे पालनपोषण करायचा. एके दिवशी एका श्रीमंत माणसाने त्याच्या रिक्षातून प्रवास केला. तो अतिशय घाईत असल्यामुळे आपली बॅग रिक्षातच विसरून गेला. थोड्या वेळाने त्या रिक्षावाल्याच्या ही गोष्ट लक्षात आली. तो ती बॅग घेऊन ज्या इमारतीत तो श्रीमंत माणूस गेला होता त्या इमारतीत गेला व त्या श्रीमंत माणसाला शोधून काढून त्याची बॅग त्याला परत केली. त्या श्रीमंत माणसाला खूप आनंद झाला कारण त्या बॅगेमध्ये त्याची महत्त्वाची कागदपत्रे व पैसे होते. रिक्षावाल्याचा हा प्रामाणिकपणा पाहून त्या श्रीमंत माणसाने बक्षीस म्हणून त्याला काही पैसे देऊ केले. परंतु त्या गरीब

रिक्षावाल्याने नम्रपणे त्याला नकार दिला. यावरून त्या गरीब रिक्षावाल्याच्या मनाची श्रीमंती दिसून आली. खरं तर तो रिक्षावाला खूप गरीब असल्यामुळे तो बॅग घरी घेऊन जाऊ शकला असता. परंतु त्याने तसे न करता प्रामाणिकपणाने ती बॅग त्या श्रीमंत माणसाला नेऊन दिली. म्हणून श्रीमंत माणसाने त्याची सर्व विचारपूस करून त्याच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली.

तात्पर्य – प्रामाणिकपणाचे फळ हे नेहमी चांगलेच मिळते.

**इ) खालीलपैकी एक कृती सोडवा.**

१) **प्रसंगलेखन** –

पहिला पाऊस

आपला भारत कृषिप्रधान देश! त्यात शेतक-यांची संख्या जास्त. बहुधा पावसावर अवलंबून राहणारी, दैववादी! ...... आणि वर्षाऋतू मात्र मोठ्ठा लब्बाड! लपंडाव खेळणारा! वाट पाहायला लावणारा! सृष्टीसह सर्व सजीव त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसतात. तहानेने व्याकूळ होतात. मेघराजाला साकडं घालतात.

"देवा, मेघराया, आता नका जाऊ डोकवून
मायमाऊलीला करा ओल्या करुणेचे दान||"

यावर्षी असेच झाले. सारा मे महिना कोरडा गेला. सजीव सृष्टी हैराण झाली. शेतक-यांनी जमिनीची मशागत करुन ठेवली. शहरातल्या लोकांनी छत्र्या, रबरी बूट, रेनकोट खरेदी करुन ठेवले. शाळा उघडण्याचे दिवस जवळ आले. सगळेजण पावसाच्या स्वागतासाठी सज्ज झाले. ...... आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात एक दिवस अचानक चक्रीवादळ घुमू लागले. पांढरे ढग काळे होऊ लागले. ऊन दिसेनासे होऊन होरपळणारी सृष्टी ढगांच्या सावलीखाली झाकून गेली. ढगांची झुंबरं हलू लागली. ढग ढोल वाजवू लागले. विजांचा कडकडाट सुरू झाला. ……. आणि त्यापाठोपाठ गारांचा वर्षाव.....! त्याचबरोबर पावसाचे टपोरे थेंब कोसळू लागले. सारी सृष्टी न्हाऊन निघाली. बाहेर वादळी पाऊस कोसळत असताना मुलांसह मोठी माणसं घराबाहेर, रस्त्यावर आली. गारा वेचून तोंडात टाकू लागली. पावसाच्या धारा अंगावर घेत अक्षरशः नाचू लागली. मातीचा गंध वातावरणात पसरला. रस्त्यावर मातीमिश्रित पाण्याचे लोट वाहू लागले. खड्डे पाण्याने भरले. मुलं पाण्यात कागदाच्या नावा करुन सोडू लागले. एवढा पाऊस कोसळला पण बाहेर जाताना कुणाला छत्र्या घ्याव्याशा वाटल्या नाहीत, कारण पहिल्या पावसात भिजण्यातच सर्वांना अवर्णनीय आनंद होत होता.

पक्षी आनंदाने चिवचिवाट करू लागले. पाऊस झेलण्यासाठी त्यांनी आपले पंख पसरले. झाडे-झुडपे आनंदाने मोहरली, त्यांनीही पहिल्या पावसात आंघोळी केल्या. सर्व सृष्टी एकाच पावसात हिरवीगार, टवटवीत दिसू लागली.

टी. व्ही. वर पावसाच्या बातम्यांचा भडीमार सुरू झाला. मुसळधार पावसामुळे रस्त्यातून बसेस, छोट्या गाड्या रांगू लागल्या. बस स्टॉप, रेल्वे स्थानकं माणसांनी भरून गेली. लोकांची झालेली फाजिती टी. व्ही. वर दिसली.

या पावसाने शेतकरी सुखावले. ओढे वाहू लागले. जनावरे हंबरू लागली. शेतकरी हरितक्रांतीचे स्वप्न पाहू लागले. वाटा चिखलमातीने भरून गेल्या. दुस-या दिवशी वर्तमानपत्रांचे पावसाबद्दल रकानेच्या रकाने भरून आले. त्यावेळी एक कविता आठवली –

आकाशात चाललेला गडगडाट
गोठ्याकडे उधळणा-या गाई
रोंरावत येणारा वळवाचा पाऊस
तापलेली धरणी झाली शांत शांत|